**अति. महा. आयुक्त कार्यालय (इस्टेट)**
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अतिमआ (इ) / मावतं / ५७१ – (f+s) ३५५
दिनांक -: १९/०७/२०२१

# कार्यालयीन परिपत्रक

**विषय -: पुणे मनपा सोशल मिडिया कक्षाची व्यापक स्वरुपामध्ये अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ -: अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) कार्यालय जा.क्र. अतिमआ(इ)/९६७
दि. १७/०५/२०२१.

पुणे महानगरपालिकेमध्ये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत सन २०१५ मध्ये सोशल मिडिया कक्ष सुरु करण्यात आला असून माहिती तंत्रज्ञान विभागाचे स्तरावर सोशल मिडिया कक्षाचे कामकाज सुरु आहे. यामध्ये सर्व विभागांशी समन्वय व सहकार्य आवश्यक आहे. जेणेकरून पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील नागरिकोपयोगी माहिती सोशल मिडिया माध्यमांवर प्रभावीपणे प्रसिद्ध करता येईल.

सोशल मिडिया कक्षाला व्यापक व मोठ्या प्रमाणावर सक्रीय व सक्षम करणेसाठी सर्व विभागांशी समन्वय असणे आवश्यक आहे. प्रत्येक खात्याकडील नागरीकांसाठी प्रसिद्ध करणेजोगी माहिती संकेतस्थळ व सोशल मिडिया कक्षाला पुरविणेसाठी खातेप्रमुख / विभागप्रमुख यांनी आपल्या खात्याची इथ्यंभूत माहिती असणाऱ्या दोन समन्वयक (IT Nodal Officer) यांची नेमणूक करावी व त्यांची नावे माहिती व तंत्रज्ञान विभागास ऑनलाईन पद्धतीने कळविणेत यावी. माहिती ऑनलाईन भरणेसाठी पुढील **Google Form** च्या लिंकवर **https://forms.gle/L1qenRUkRLSqb3uy5** क्लिक करावे आणि विचारलेली माहिती भरावी. काही विभागांनी यापूर्वीच माहिती ऑनलाईन पद्धतीने भरलेली आहे त्या विभागांनी पुन्हा माहिती भरण्याची आवश्यकता नाही. माहिती न भरलेल्या विभागांची यादी सोबत जोडलेली आहे.

खातेप्रमुख / विभागप्रमुख यांनी आपल्या विभागाकडील नागरिकोपयोगी व प्रसिद्ध करणेजोगी माहिती जसे सुरु असणाऱ्या योजना, प्रकल्प, कार्यक्रम, जाहीर प्रकटन / सूचना, करण्यात येत असलेल्या उपाययोजना, प्रेसनोट इत्यादी माहिती तसेच उपलब्ध असल्यास फोटो, व्हिडीओ **"socialmedia@punecorporation.org"** या ईमेल आयडीवर पाठवावी. तसेच माहिती प्रसिद्ध करणेसाठी सोशल मिडिया कक्षाला आवश्यक असल्यास वीर सावरकर भवन येथील माहिती व तंत्रज्ञान विभागमध्ये सोशल मिडिया कक्ष याठिकाणी उपस्थित राहून माहिती (Content) तयार करून घेऊन त्यास सोशल मिडिया माध्यमांवर प्रसिद्ध करणेसाठी नेमण्यात आलेले समन्वयक यांचेमार्फत Approval द्यावे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीस संबंधित विभाग जबाबदार असेल व त्यावर नागरिकांच्या येणाऱ्या

टिप्पणी / शेरा यास योग्य प्रतिसाद / प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे खातेप्रमुख / विभागप्रमुख यांनी जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांची सत्वर समन्वयक (IT Nodal Officer) म्हणून नेमणूक करावी व सोशल मिडिया कक्षाच्या सूचनेनुसार कार्यवाही करणेबाबत आपल्या विभागाकडील समन्वयक (IT Nodal Officer) यांना सूचना देण्यात याव्या.

कळावे.

(डॉ.कुणाल खेमनार)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट)**
पुणे महानगरपालिका

सोबत : समन्वयक (IT Nodal Officer) यांची माहिती न दिलेले विभाग यादी.

## विभाग समन्वयक (IT Nodal Officer ) साठी नावे न कळविलेले विभाग दि. १४ जुलै २०२१ पर्यंत

| अ. क्र. | विभाग / खाते | अ. क्र. | विभाग / खाते |
|---|---|---|---|
| १ | अग्निशामन विभाग | ३२ | मुख्यलेखा व वित्त विभाग |
| २ | अतिक्रमण /अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग | ३३ | मुद्रणालय विभाग |
| ३ | अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) कार्यालय | ३४ | मैलापाणी शुद्धीकरण केंद्र (STP) |
| ४ | अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) कार्यालय | ३५ | वाहतुक नियोजन विभाग |
| ५ | अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) कार्यालय | ३६ | विद्युत विभाग |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन विभाग | ३७ | विधी विभाग |
| ७ | आरोग्य विभाग | ३८ | वृक्ष प्राधिकरण विभाग |
| ८ | आस्थापना विभाग | ३९ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक व तांत्रिक) विभाग |
| ९ | उ□यान विभाग | ४० | शिक्षण मंडळ |
| १० | उपआयुक्त (विशेष) विभाग | ४१ | समाज कल्याण विभाग |
| ११ | कर आकारणी व कर संकलन विभाग | ४२ | सांस्कृतिक केंद्र विभाग |
| १२ | कामगार कल्याण विभाग | ४३ | सामान्य प्रशासन विभाग |
| १३ | घनकचरा व्यवस्थापन विभाग | ४४ | सुरक्षा विभाग |
| १४ | चाळ विभाग | ४५ | स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय विभाग |
| १५ | जिल्हा नियोजन व विकास समिती विभाग | ४६ | प्रधानमंत्री आवास योजना |
| १६ | झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग | ४७ | उप आयुक्त परिमंडळ क्र १ |
| १७ | □क्षता विभाग | ४८ | उप आयुक्त परिमंडळ क्र २ |
| १८ | □रध्वनी विभाग | ४९ | उप आयुक्त परिमंडळ क्र ३ |
| १९ | पथ विभाग | ५० | उप आयुक्त परिमंडळ क्र ४ |
| २० | पाणीपुरवठा | ५१ | उप आयुक्त परिमंडळ क्र ५ |
| २१ | बांधकाम विकास विभाग | ५२ | औंध क्षेत्रिय कार्यालय |
| २२ | भवन रचना विभाग | ५३ | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय |
| २३ | भूसंपा□न व व्यवस्थापन विभाग | ५४ | घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय |
| २४ | मंडई विभाग | ५५ | ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय |
| २५ | मध्यवर्ती भांडार विभाग | ५६ | धनकवडी क्षेत्रिय कार्यालय |
| २६ | मलनिःसारण, □खभाल व □रूस्ती विभाग | ५७ | नगररोड क्षेत्रिय कार्यालय |
| २७ | महापालिका आयुक्त कार्यालय | ५८ | भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय |
| २८ | मालमत्ता व व्यवस्थापन विभाग | ५९ | वानवडी क्षेत्रिय कार्यालय |
| २९ | माहिती व जनसंपर्क विभाग | ६० | वारजे क्षेत्रिय कार्यालय |
| ३० | मुख्य अभियंता प्रकल्प | ६१ | हडपसर क्षेत्रिय कार्यालय |
| ३१ | मुख्य लेखा परीक्षक विभाग | | |